# आपला संसार हा सुखी व आनंदमय हो

प्रसन्नचित्त चेहरा सर्वांनाच प्रिय वाटतो. आपला आनंद दुसऱ्यांमध्येही आनंदाची लहर निर्माण करतो. आनंद श्रेष्ठ भाग्याची, पुण्य कर्माची व प्राप्त दुवांची ओळख आहे. प्रसन्न राहणे हेच खरे जीवन आहे. परंतु कुणाला आनंद प्राप्त झाला नाही तर ते लोक आपला आनंद कृत्रिम साधनामध्ये करतात परंतु त्या साधनातून देखील जो आनंद आपल्याला हवा असतो तो मिळत नाही.

कोणी घेतलाय मनुष्याला आनंद? का त्रस्त आहे हा बुद्धिवान मनुष्य तणावामुळे? गंभीरतेने जर तुम्ही त्याचे निवारण केले तर आपले जीवन आनंदाच्या खजान्याने भरुन जाईल आजचे हे स्पर्धात्मक युग आहे. यात जो धनवान आहे तोच सन्मान मिळवितो. तोच महान म्हटला जातो. गरीब कितीही चारित्र्यवान असला तरी त्याचे कुठेच स्थान नसते. त्यामुळे लोकांमध्ये धनवान बनण्यासाठी स्पर्धा लागली आहे. पैसे कमवायचे आहेत, मग ते कसे का असेना. दुसरी गोष्ट सामाजिक व्यवस्था व इच्छाच्या अतिपणामुळे माया (पैसा) जमा करण्यासाठी मनुष्य लाचार आहे. शिक्षण महाग, औषधी महाग, लग्न खर्च, जेवण महान सर्व काही महाग त्यामुळे पैसा प्राप्त करण्यासाठी मनुष्य पापकर्म करीत आहेत. पापकर्म मनुष्याच्या आनंदाला खात आहे. पैशासाठी पाप, क्रोध व कामासाठी पाप, लोभ व मानसन्मानासाठी पाप, पुढे मोठं होत राहण्यासाठी नविन-नविन पाप मानव जीवनात वाढत चालले आहे. आजही दुनिया पापाची आहे. त्याचे कार्यभाग्यही पापाचे व त्यांचे संबंध देखील पापाचे आहेत. पापी मनुष्य कितीही आनंदी रहीला तरी आनंद दुर उभे राहून त्याचा उपहात्य करीत असते.

ज्या मनुष्याला त्याचा जीवनात आनंद मिळवायचा असतो. त्यांना पापाला ओळखून त्याला सोडण्याचा दृढ संकल्प करायला हवा. तुम्ही स्वतः ला विचारायला हवे की, तुम्हाला फक्त  हे धनच पुष्कळ हवे आहे की, आनंदही हवा आहे? आपण पुष्कळ असे धनवान व धनी संसार पाहिले असतील की, ज्यांनी परेशान होऊन संन्यास घेतला आहे. पुष्कळ लोकांना अनिद्रेने परेशान असल्याचे पाहिले असेल. तर बरेच जनाना डिप्रेशनचा शिकार होताना पाहिले आहे.

आपल्या पुण्याचे खाते भरपूर कराल तर आपले जीवन आनंदाने फुलुन निघेल हे पैसे मनुष्याला मुस्कीलीत वाचवत नाहीत तर आपले पुण्य कर्मच आपल्याला तारतात. पापी मनुष्य परमेश्वरासमोर आपले डोके उठवूच शकत नाहीत. व त्याचे पाप या समाजापुढे आले की, त्याला या समाजापासून आपले डोके लपवून ठेवले लागते. व सर्वात भयानक बाब ही की, पापी मनुष्याचा अंत फारच भयानक होत असतो.

आनंद नष्ट होण्याचे कारण आणखी एक आहे की, मनुष्याचे अधिक सेन्सीटीव्ह होने, म्हणजेच थोड्या-थोड्या गोष्टीची फिलींग येणे. अशा व्यक्ती नेहमीच कमजोर होत जाईल. कोणीही त्याच्या आनंदाला नष्ट करुन टाकेल. तो लवकरच क्रोधाच्या आहारी जाईल, चिडचिडेपणा त्यांच्यात असेल. त्यामुळे आनंद हवा असेल तर नाजुक स्वभावाचा त्याग करावा लागेल.

तसेच आनंद नष्ट होण्याचे तिसरे कारण म्हणजे पळा-पळीचे जीवन येथे जसे कोणाला कोणाशी मिळायला वेळ मिळत नाही. आई-वडिलांकडे मुलांना प्रेम द्यायला वेळ मिळत नाही. जीवनामध्ये आपल्या परिवारासाठा वेळ द्यायला हवा. जरी जीवनामध्ये पळापळी जास्त आहे तर आपल्याला जाणून घ्यायला हवे की, आपण आपल्या मनाला व कार्याला ठिकपणे सेट केले आहे की नाही.

आनंद संपण्याचे चौथे कारण आहे. जीवनात वाढत चाललेल्या समस्या ज्यांनी या जीवनाला संघर्षमय बनवले आहे. मनुष्यामध्ये आपुलकीची व सहयोगाची भावना लोप होत चालली आहे. मन स्वार्थाचे भरले आहे. त्यामुळे खुशी राहत नाही. समस्यांशी लढण्याकरीता ज्ञान, योग, मनोबल व परस्पर सहयोगाची गरज आहे. आपण पाहतो की, जे लोक ज्ञान योग करतात. परमेश्वराचे बनुन जातात. त्यांच्या जीवनात आनंदाची लहर पसरते. त्याचे चेहरे चमकु लागतात. त्या गरीबांना देखील लोक धनवान समजू लागतात व नक्कीच ते धनवान बनतात कारण त्यांना अलौकीक संपत्ती मिळत असते.

परमेश्वर या वेळेला आनंदाचा खुप मोठा खजीना घेऊन आला आहे. त्याचे बनल्यामुळे आनंद हा आपला अधिकारच बनून जातो. मनुष्य जीवनच एक अनमोल जीवन आहे, आनंद जीवनाचा शृंगार आहे. आनंदाचे हिरे-मोती जीवनाच्या आभुषणात  घडवून घ्यायला हवे कारण व्यक्तीचे व्यक्तीमत्व त्याचे आकर्षण आहे. तर या आपण सर्व मिळून या कलीयुगाच्या संघर्षमय जीवनाला सरळ बनवून भरपूर आनंदीत करुया. आपण प्रतिज्ञा करु की, काहीही झाले तरी आपली खुशी कधीच कमी न होवो, मग आपले शरीर सुटले तरी चालेल. आपण जिंकू किंवा मरु, सुखी असू किंवा दुः खी, पैसा असो वा नसो, परंतु आनंद आपल्या सोबत आपल्या सावली प्रमाणेच राहवा. व आनंदीत राहण्याची कला, शक्ती ही राजयोग ईश्वरीय ज्ञानामुळेच प्राप्त होत असते.

**- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स**

**www.bkvarta.com**